॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२० ( प्रतिनिधी) :- एम.एड ची केंद्रीय प्रवेश पध्दतीने प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सी.ई.टी. परीक्षेचे ऑनलाईन अर्ज कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागाच्या वतीने मोफत भरून देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागात एम.एड अभ्यासक्रमाच्या ५० जागा आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता महाराष्ट्र शासनाच्या सामाईक प्रवेश परीक्षेमार्फत प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. बी.एड उत्तीर्ण अथवा परीक्षेसाठी पात्र असलेले विद्यार्थी किंवा पदवीसह डी.टी.एड. उत्तीर्ण विद्यार्थी एम.एड. प्रवेशासाठी पात्र आहेत. केंद्रीय प्रवेश परीक्षेसाठी २५ जानेवारी ही अंतीम तारीख असून विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागात या सीईटी परीक्षेचे ऑनलाईन अर्ज भरून देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष विभागात येवूनअथवा विभागप्रमुख **डॉ. मनीषा इंदाणी अथवा डॉ. संतोष खिराडे यांच्याशी 0257-2258431, 2257437 या क्रमांकावर संपर्क साधावा** असे आवाहन करण्यात आले आहे.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५ दि २० जानेवारी २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२० ( प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागाच्या वतीने भरत नाट्यमच्या सुप्रसिध्द नृत्यकार व संगीताचार्य डॉ. स्वाती दैठणकर यांचे नृत्यप्रयोग या विषयावर व्याख्यान झाले.

यावेळी जळगावच्या पायल संगीत व नृत्यालयाचे संचालक संजय पवार, अधिसभा सदस्य नेहा जोशी, आंतरविद्या शाखा अभ्यास प्रशाळेच्या संचालक डॉ. मनीषा इंदाणी, योगशास्त्र विभागप्रमुख इंजि. राजेश पाटील यांची उपस्थिती होती. डॉ. स्वाती दैठणकर म्हणाल्या की, प्राचीन भारतीय परंपरेतील नृत्य व योग आणि अध्यात्मिकता यांचे एकत्रिकरण म्हणजे नृत्य योग होय. महर्षि पंतजली यांनी लिहिलेल्या पांतजल योगसूत्र व भरत नाट्यम मधील प्रत्येक हालचाली एकरूपता दिसून येते. यावेळी त्यांनी भरतनाट्यम मधील चतुरस्त्र शरीरस्थिती, हस्त, आकृतीबंध, अभिनय, ताल आणि लय या प्रत्येक गोष्टीचे योगाशी असलेले साम्य प्रात्यक्षिक दर्शवित मनोरंजन पध्दतीने उलगडून दाखविले. यावेळी डॉ. लिना चौधरी यांनी ओंकारप्रार्थना सादर केली. प्रा. गितांजली भंगाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. लिन्ता चौधरी यांनी आभार मानले.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५ दि २० जानेवारी २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी